# जळगांव जिल्हा पोलीस भरती २०१८
# उमेदवारांना जाहीर सुचना

जळगांव जिल्हा पोलीस भरती-२०१८ मध्ये **११२ खुल्या प्रवर्गासाठी** दिनांक १२/३/२०१८ ते ७/४/२०१८ या कालावधीत पोलीस भरती मध्ये मैदानी चाचणी मध्ये जे उमेदवार ५० किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवुन उत्तीर्ण झालेले आहेत त्या सर्व उमेदवारांची सर्वसाधारण यादी शहर वाहतुक शाखा, जळगांव येथे सूचना फलकावर लावण्यांत आलेली आहे.

तसेच जळगांव जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळ www.jalgaonpolice.gov.in व www.mahapolice.gov.in तसेच www.mahapolice.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याबाबत उमेदवारांना त्यांनी दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर SMS द्वारा सुध्दा अवगत करण्यात येत आहे.

उमेदवारांना त्यांचे नांव, चेस्ट नंबर, प्रवर्ग, समांतर आरक्षण, जन्म तारीख, गुणांबाबत काही शंका असल्यास दिनांक ०९/०४/२०१८ रोजी १६.०० वाजे पावेतो ( **म्हणजेच दिनांक ०९/०४/२०१८ रोजी दुपारी ४ वाजेपावेतो** ) पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे नांवे लेखी अर्ज पोलीस उप अधीक्षक (गृह), जळगांव पोलीस अधीक्षक यांचे कार्यालयात समक्ष आणुन दयावे किंवा फॅक्स क्रमांक ०२५७/२२२०५११ किंवा dysphome.jalgaon@gmail.com या ईमेलवर सुध्दा निवेदन पाठवू शकतात. विहीत दिनांक व वेळेत अर्ज प्राप्त न झाल्यास आपली शंका विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

१:१५ प्रमाणका नुसार लेखी परिक्षेस पात्र होणाऱ्या उमेदवारांची यादी दिनांक १०/०४/२०१८ रोजी www.jalgaonpolice.gov.in व www.mahapolice.gov.in तसेच www.mahapolice.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर प्रसारीत करण्यात येणार आहे.

पोलीस अधीक्षक, जळगांव.